भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ८८ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५/०२/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०४/२/२०१७ चे १२.०० ते १२.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी ईश्वर कोठीराम चुधरी वय ५५ वर्ष, रा. चिखली पोस्टे अडयाळ यांनी आपली हिरो होंडा पॅशन प्लस कंपनीची मोटार सायकल क्र. एमएच ३१ सीडी १७२० किंमती ३०,०००/–रु. ची तहसिल कार्यालय समोर भंडारा गेट समोर ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई:–**

दिनांक ०४/०२/२०१७ चे १८.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम १७८० चा चालक हा दारु पिऊन दारुचे नशेत आमरोडवर सार्वजनीक ठिकाणी असंतुलीतरीत्या चालवितांना मिळुन आल्याने त्याचे दारु पिल्याबाबतचे ग्रामीण रुग्णालय पवनी येथुन वैदयकीय अहवाल प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. कोडवते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) मेडीकल ऑफीसर असल्याची बतावणी करुन पैश्यासाठी तोत्यागीरी करुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/२/२०१७ चे ०७.०० वा. दर. ते दिनांक ०४/०२/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी चंद्रशेखर दयाराम भुरे वय २१ वर्ष, रा. शिवाजी वार्ड साकोली हा आर्मी भरती मध्ये दि. २३/०१/२०१७ रोजी पुणे येथे हजर राहुण मेडीकल मध्ये पात्र ठरला यातील आरोपीने फिर्यादीचे वडीलाचे मोबाईल नं. वर आरोपीने आपल्या मोबाईल वरुन दिनांक ०१/०२/२०१७ ला फोन केला व मी पांडे सर मेडीकल ऑफीसर नागपुर येथुन बोलतो तुझा मुलगा चंद्रशेखर भुरे याची आर्मी मध्ये निवड झाली आहे. या करीता मला ३,३०,०००/–रु. पाहीजे पैसे दिले नाहीतर तुझ्या मुलाला आर्मी मध्ये अनफीट करतो अशी धमकी दिली. तसेच दिनांक ०४/०२/२०१७ चे १९.०० वा. दर. आरोपी हा फिर्यादीचे घरा समोर येऊन फिर्यादीस तुला आर्मी मध्ये भरती व्हायचे असेल तर ३,३०,०००/–रु. दे नाहीतर तुला अनफीट करतो अशी पुन्हा धमकी दिली. सदर इसम हा ऑफीसर नसुन सर्वसाधारण व्यक्ती आहे. फिर्यादीची फसवणुक करुन पैसे लुबाडण्याच्या ईऱ्यादयाने मेडीकल ऑफीसर नसुन सुध्दा मेडीकल ऑफीसर आहे. अशी बतावनी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७०,५०७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजणे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) विहीरीचे पाण्यात बुडुन युवतीचा मृत्यु. :–**

दिंनाक ०४/०२/२०१७ रोजी ०६.०० वा. दरम्यान. यातील मृतक कु. रेमा मडीया मेंडा वय २७ वर्ष, रा. अलीपुर म. प्र. ह. मु. उमा प्लॉस्टीक कंपनी पालगाव/आंबाळी ही दिनांक ०४/०२/२०१७ चे ०६.०० वा. दर. संडासकडे जाते म्हणुन समारेचे शेतात गेली परंतु घरी परत आली नाही म्हणुन फिर्यादी हा पाहण्यास गेला असता शेताचे विहीरी जवळ चप्पल व शॉल मिळुन आल्याने सरीमा व रस्सा विहीरीत टाकले असता मृतकचे प्रेत विहीरीचे पाण्यात मिळुन आल्याने फिर्यादी जवसिंह मडीया मेंडा वय २७ वर्ष, रा. हुडलवाणी जि. अलीराजपुर म. प्र ह. मु. उमा प्लॉस्टीक कंपनी पालगाव/आंबाळी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे १७४ कलम जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गोपाले पो. स्टे. कारधा हे करीत आहे.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०४/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक ०१ केसेस, तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६८ केसेस करण्यात आलेल्या आहेत

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.